सर्वांगयोग ग्रंथातील त्रिपाद संकल्पनेचे विश्लेषणात्मक अध्ययन

(दशोपनिषदे-श्रीमद्भगवद्गीता-योगोपनिषदे यांच्या विशेष संदर्भात)

भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकायांतर्गत

योगशास्त्र विषयात Ph.D. उपाधीसाठी सादर करावयाच्या

प्रबंधाची संक्षिप्त रूपरेखा

संशोधिका

जान्हवी ऋतुराज भांडारी

मार्गदर्शिका

प्रा. डॉ. कलापिनी अगस्ती

विभागप्रमुख, भारतीयदर्शन विभाग

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय,

रामटेक, नागपूर, महाराष्ट्र

२०२४

विषयसूची

१. प्रस्तावना

२. विषयाची आवश्यकता

३. पूर्व संशोधनाचा आढावा

४. संशोधनाची उद्दिष्टये

५. व्याप्ती व मर्यादा

६. गृहीतके

७. संशोधन पद्धती

८. प्रकरणांची विभागणी

९. संदर्भग्रंथ सूची

सर्वांगयोग ग्रंथातील त्रिपाद संकल्पनेचे विश्लेषणात्मक अध्ययन
(दशोपनिषदे-श्रीमद्भगवद्गीता-योगोपनिषदे यांच्या विशेष संदर्भात)

१. प्रस्तावना

अणूरणीयां थोकडा । तुका आकाशाएवढा ॥1॥
गिळूनी सांडिले कलेवर । भवभ्रमाचा आकार ॥ ध्रु
सांडिले त्रिपुटी । दीप उजळला घटी ॥2॥
तुका म्हणे आता उरलो उपकारापूरता ॥ 3॥

तुकारामांचा हा अभंग जेंव्हा वाचनात आला. तेंव्हापासून त्रिपाद म्हणजे काय? असा शोध सुरू झाला. तेव्हाच अध्यात्म विज्ञानशाळेबद्दल समजले. ही शाळा नर्मदाकाठी ओंकारेश्वरला आहे. इथे सर्वांगयोग हा ग्रंथ शिकवला जातो. या ग्रंथात वेदातील त्रिपाद संकल्पनेतील तीन पाद वेगवेगळे कसे जाणायचे व त्याच्या समन्वय कसा करायचा याची पद्धती दिली आहे.

सर्वांगयोग ग्रंथाची रचना भगवान श्री मायानंद चैतन्य यांनी १९२३ साली मध्यप्रदेश येथील नर्मदातटावर असलेल्या "सिद्धनाथ" या स्थानावर केली. भगवान श्री मायानंद चैतन्य यांनी वयाच्या विसाव्या वर्षी काशी येथील दशाश्वमेध घाटावर राहणारे तत्त्वदर्शी सदगुरु विशुद्धानंदसरस्वती यांची भेट घेऊन, त्यांना वारंवार विनंतीकरून त्यांच्याकडून योगयुक्ती प्राप्त केली. त्यानंतर श्रीमायानंद चैतन्य ह्यांनी वीस वर्षे त्यावर मनन चिंतन केले. नर्मदा परिक्रमा करतांना त्यांना एके दिवशी योगयुक्तीचा प्रत्यक्ष अनुभव प्राप्त झाला. हा अनुभव केवळ आपल्यापुरताच मर्यादित न ठेवता ही प्रक्रिया जनसामान्यांपर्यंत कशी पोहोचवता येईल याचा ते विचार करू लागले. द्वितीय नर्मदा परिक्रमा करतांना त्यांनी आपला विचार कृतीत उतरवला आणि सर्वांगयोगाची रचना केली. एवढ्यावरच ते थांबले नाहीत. सर्वांगयोगात सांगितलेली प्रक्रिया शिकवण्यासाठी त्यांनी मध्यप्रदेश येथील ओंकारेश्वरला "अध्यात्म विज्ञान शाळा" स्थापन केली. आजही येथे शास्त्रशुद्ध पद्धतीने सर्वांगयोग ग्रंथातील प्रक्रियेच्या आधाराने योगयुक्ती शिकवली जाते. या योगयुक्तीला त्यांनी दिव्यदृष्टि असे नाव सर्वांगयोग ग्रंथात दिले आहे. भगवान श्री मायानंद चैतन्य यांनी सर्वांगयोग ग्रंथाच्या आधाराने गीतोपनिषद, भगवद्गीता-समश्लोकी, चमत्कार निर्णय, नर-नारायण, विज्ञान प्रकाश भाग १ व २, दिव्यदृष्टी, बुद्धसुक्त इत्यादी अनेक सखोल ग्रंथ लिहिले आणि अध्यात्मशास्त्र कशाप्रकारे सर्वांगयोग ग्रंथाच्या आधारे अभ्यासता येते हे सांगितले. पातंजल योगशास्त्राला सर्वांगयोग ग्रंथाच्या आधाराने कसे यथार्थ बोध दृष्टीने

जाणता येते, हे ही त्यांच्या "चमत्कार निर्णय" या ग्रंथामध्ये सखोल विश्लेषणाद्वारे त्यांनी मांडले आहे. ही सगळी ग्रंथमालिका करत असतांना त्यांनी भारतभर भ्रमण करून अनेकांना सर्वांगयोग ग्रंथ शिकवला. सर्व मानवमात्रांना कळावे यासाठी अगदी सरल हिंदी भाषेमध्ये सर्वांगयोग ग्रंथाची रचना केली गेली. यामध्ये ५९ (एकोणसाठ) श्लोक आहेत. आठ अध्यायांमध्ये सर्वांगयोग ग्रंथाची मांडणी केलेली आहे. ही मांडणी अनुष्टुप छंदात केलेली आहे, यामुळे सर्वांगयोग ग्रंथ चालीत सहज म्हणता येतो. सर्वांगयोग ग्रंथ संपूर्ण मानवतेसाठी आहे यामध्ये लिंग, वर्ण, जात, पंथ, धर्म, संप्रदाय यापैकी कोणताही भेदभाव नाही. (संदर्भ: बुद्ध अवतार, श्री मायानंदजी चैतन्य का जीवन चरित्र)

भगवान श्री मायानंद चैतन्य यांनी आपले स्वमत किंवा आपला एखादा नवीन अविष्कार येथे दिलेला नाही. जे अध्यात्मशास्त्रातील ग्रंथात सांगितलेले आहे तेच पुन्हा प्रस्तुत काळामध्ये सहजतेने समजावे यासाठी सर्वांगयोग ग्रंथ आहे. जसे आपल्या सर्व संतानी त्यावेळच्या समाजरचनेनुसार त्याकाळात जी भाषा प्रचलित होती, त्या भाषेत वेदातील ज्ञान सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत समजावून सांगितले, यामुळे सामान्यजनांना आकलन होण्यास सोपे झाले.

योगशास्त्राची रचना परमसत्-परमात्मस्वरूपाचे ज्ञान प्राप्त करून परमात्म-स्वरूपाशी योग करण्यासाठी आहे. महर्षि व्यास रचित "श्रीमद्भगवद्गीता" ब्रह्मविद्ये अंतर्गत असलेल्या योगशास्त्राचेच निरुपण आहे. "योग" अर्थात् परमसत्-परमात्म स्वरूपाशी एकरूप होणे आणि "शास्त्र" अर्थात् प्रत्यक्ष तंत्र पद्धत होय. योगशास्त्र हे परमात्मस्वरूपाला जाणायची आणि एकरूप होण्याची प्रक्रिया कशी आहे याविषयीचे शास्त्र आहे. श्रीमद्भगवद्गीता हे उपनिषदांचे नवनीत आहे. (सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदन), तर उपनिषदे हे वेदांचा अंतिम भाग म्हणजेच वेदातील तत्वज्ञान वेदान्त आहेत. म्हणून या प्रबंधात या सर्व ग्रंथांचा आधार घेण्यात येईल.

त्रिपाद संकल्पनेचे बीज ऋग्वेदात सापडते. ऋग्वेद हा जगातील प्रथम ग्रंथ मनाला जातो. विष्णुपरंपरेतील हे ज्ञान आहे. सप्तभूमीकांचा धारक हा विष्णु आहे. ऋग्वेदातील १ ले मंडल सूक्त २२ यातील १६ ते २१ ऋचा - यामध्ये त्रिपाद संकल्पनेचा उल्लेख प्रथम सापडतो.

अतो॑ दे॒वा अ॑वन्तु नो॒ यतो॒ विष्णु॑र्विचक्र॒मे। पृ॒थि॒व्याः स॒प्त धाम॑भिः॥16॥
इ॒दं विष्णु॒र्वि च॑क्रमे त्रे॒धा नि द॑धे प॒दम्। समू॑ळ्हमस्य पांसु॒रे॥17॥
त्रीणि॑ प॒दा वि च॑क्रमे॒ विष्णु॑र्गो॒पा अदा॑भ्यः। अतो॒ धर्मा॑णि धा॒रय॑न्॥18॥
विष्णोः॒ कर्मा॑णि पश्यत॒ यतो॑ व्र॒तानि॑ पस्प॒शे। इन्द्र॑स्य॒ युज्यः॒ सखा॑॥19॥
तद्विष्णोः॑ पर॒मं प॒दं सदा॑ पश्यन्ति सू॒रयः॑। दि॒वी॑व॒ चक्षु॒रात॑तम्॥20॥
तद्विप्रा॑सो विप॒न्यवो॑ जागृ॒वांसः॒ समि॑न्धते। विष्णो॒र्यत्प॑र॒मं प॒दम्॥21॥

या शोध प्रबंधात वेदातील त्रिपाद संकल्पनेचे विश्लेषण सर्वांगयोग या ग्रंथाच्या आधाराने करण्यात येईल.

त्रिपाद संकल्पना - वेदकालापासून परमात्म स्वरूपाला यथार्थतेने जाणण्यासाठी त्रिपाद या संकल्पनेचा उपयोग केलेला दिसतो. कोणत्याही विषयाला संपूर्णत: आणि सखोल समजून घेणे ही एक आवश्यकता आहे. ऐकणे, वाचणे, मानणे इ. मार्गांनी एखादा विषय समजू शकतो, परंतु त्या विषयाचा सर्वांगीण बोध म्हणजेच निश्चय होऊ शकत नाही. विषयाला संपूर्ण जाणण्यासाठी त्रिपाद संकल्पना उपयोगी आहे. तीन पादांच्या सहाय्याने विषयाचा सर्वांगीण बोध होऊ शकतो. प्रथम समजण्यासाठी आपण आपला परिचय त्रिपादीच्या आधाराने करून पाहू. आपली बाहेर असणारी देहरूप अंग-उपांगे व्यक्त रूपाने जरी दिसत असली, तरी त्या सर्व अंगांना आपण पूर्णत: जाणत नाही. मन, बुद्धी, चित्त, अहंकार या आत असणाऱ्या आपल्याच अव्यक्त अंगांना आपण पूर्णत: जाणत नाही. आपल्याच बाहेरून म्हणजे व्यक्त आणि आतून म्हणजे अव्यक्त, या दोन्ही अंगांना जाणल्याशिवाय आपली स्वत:चीच आपल्याशी ओळख होऊ शकत नाही. अव्यक्त आणि व्यक्त या दोन्ही अंगांना स्वतंत्र अस्तित्व नसून यांनी एकमेकांना असे व्यापले आहे की थोड्यावेळेसाठी सुद्धा त्यांना वेगळे करता येत नाही.

याचाच अर्थ, आपण स्वत: आतून-बाहेरून अनेक अंग-उपांगांनी युक्त असूनसुद्धा एकच आहोत. आपण एकाचवेळी अंग-उपांगांच्या रूपांत अनेक आहोत आणि त्याचवेळी 'अहं'/"मी" स्वरुपात एक सुद्धा आहोत. असाच आपला निश्चय आहे म्हणून आपण प्रत्येकजण स्वत:ला "मी" म्हणतो, कारण प्रत्येक अंगांमध्ये 'मी' आणि सर्व अंगे 'माझी' असा हा एकटा 'मी'चा अनुभव करीत असतो.

येथे तीन दृष्टीकोन आपल्याला जाणण्यासाठी आले आहेत.

१. व्यक्त भाव = बाहेरून दिसणारे आपले स्थूल अंग-उपांग

२. अव्यक्त भाव = आत असलेले सूक्ष्म अंग

३. व्यक्त+अव्यक्त = व्यक्ताव्यक्त अर्थात् वरील दोन्ही भाव वेगळे नसून , दोन्ही मिळून "मी" आहे



वरील प्रमाणे त्रिपादाच्या युक्तीची ओळख झाल्यावर, त्रिपादाच्या तीन स्थानांचा समष्टीच्या दृष्टीने विचार करतांना त्यांना क्षर-अक्षर-पुरुषोत्तम असे म्हणतात. त्रिपाद संकल्पना जाणली की ग्रंथात आलेल्या त्रिपादी यांचा गुढार्थ समजण्यास सुलभ होतो. विषय समजण्यास सुलभ होण्यासाठी भिन्न कार्य आणि लक्ष्यार्थ व उद्देश या प्रमाणे नावे बदलतात.

काही त्रिपादी -

	पंचमहाभूत	भगवद्गीता	ओंकार	ज्ञान	देह	वेद
व्यक्त	रूप	क्षर	अकार	ज्ञाता	स्थूल	तत्
अव्यक्त	चक्षु	अक्षर	उकार	ज्ञान	सूक्ष्म	त्वम
व्यक्ताव्यक्त	अग्नि	पुरुषोत्तम	मकार	ज्ञेय	कारण	असि

पातंजल योगदर्शन - क्षीणवृत्तेरभिजातस्येव मणे**र्ग्रहीतृग्रहणग्राह्येषु** तत्स्थतदञ्जनतासमापत्तिः ॥ १.४१ ॥

ग्रहीतृ , ग्रहण , ग्राह्य

दोन भिन्न पदार्थ ऐकमेकांत मिसळले की तिसरा पदार्थ निर्माण होतो. दोन्ही पदार्थांना तिसरा धारण करतो.

२. विषयाची आवश्यकता

एवम्, परम्पराप्राप्तम्, इमम्, राजर्षयः, विदुः,
सः, कालेन, इह, महता, योगः, नष्टः, परन्तप ॥ गीता 4.2 ॥

परंपराप्राप्त ज्ञान ऋषिगण जाणत होते, काळाच्या ओघात शिक्षण पद्धती बदलली व ग्रंथात सांगितलेले ज्ञानाचे आकलन होणे कठीण वाटू लागले.

भारतीय तत्त्वज्ञानात श्रुती(वेद), उपनिषदे, स्मृती, शास्त्र, दर्शने, पुराणे, संतसाहीत्य इत्यादि विपुल ग्रंथसंपदा आहे. अनुभवजन्य ज्ञानाचा भारताला मिळालेला वारसा खूप अमूल्य आहे. ज्ञान जाणून घेण्याची एक पद्धती आहे. अध्यात्मशास्त्रातील मूलभूत संकल्पनेतून या ज्ञानाचे आकलन होण्यास सोपे जाते. सर्व ग्रंथांचे लक्ष्य परमात्मतत्त्व जाणणे हे आहे.

वेदातील मूलभूत त्रिपाद संकल्पना प्रस्तुत प्रबंधात विश्लेषणाकरीता घेतली आहे. या संशोधनाचे मुख्य प्रयोजन त्रिपाद या मूलभूत संकल्पनेच्या विश्लेषणातून ग्रंथातील त्रिपाद संकल्पनेच्या गुढार्थाचे आकलन आहे. यावर फारसे संशोधन झाले नाही. कोणत्याही गोष्टीचे संपूर्ण ज्ञान होण्यास ही संकल्पना उपयोगी पडणार आहे.

3. पूर्व संशोधनाचा आढावा

त्रिपाद ही मूलभूत संकल्पना आहे. यावर फारसे संशोधन झालेले नाही.

Constitution of the universe in Vedic literature with special reference to Shri Mayananda Chaitanya, Chandekar, S B, Department of Sanskrit and Prakrit Languages, Savitribai Phule Pune University,1998

(Chandekar, 1998) या शोध प्रबंधात वेदातील मूलभूत तत्त्वे यावर संशोधन केले आहे. याचा आधार श्री मायानंद चैतन्य आहे.

प्रस्तुत शोध प्रबंधात सर्वांगयोग ग्रंथातील त्रिपादाच्या विश्लेषणाच्या आधारे निवडक ग्रंथातील त्रिपादींचा गुढार्थ समजून घेण्यात येईल.

४. संशोधनाची उद्दिष्टये

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टये खालील प्रमाणे आहेत.

१. मूलभूत त्रिपाद संकल्पनेचे तीन पाद जाणणे.
२. त्रिपाद संकल्पनेच्या आधारे निवडलेल्या ग्रंथात आलेल्या त्रिपादींचा गुढार्थ समजून घेणे.
३. त्रिपाद संकल्पनेच्या अभ्यासातून त्याचे परिणाम जाणणे.

५. व्याप्ती व मर्यादा

अध्यात्मशास्त्राचा विस्तार खूप मोठा आहे. याची सुरवात मुळ वेद ऋग्वेदा पासून आताच्या संतसाहित्यापर्यन्त आहे, विपुल ग्रंथसंपदा आहे. यामुळे याची व्याप्ती खूपच मोठी आहे.

या प्रबंधात दशोपनिषदे, श्रीमद्भगवद्गीता, योगोपनिषदे, सर्वांगयोग या निवडक ग्रंथांचा आधार घेण्यात येईल. तसेच त्या अनुषंगाने येणारे संदर्भही घेण्यात येईल.

६. गृहीतके

या प्रबंधाचे गृहीतक खालील प्रमाणे आहे.

१. मूलभूत त्रिपाद हि संकल्पना समजली कि ग्रंथात आलेल्या त्रिपादींचा गुढार्थ समजण्यास मदत होते.

२. कोणतीही गोष्ट समष्टी दृष्टिकोनातून जाणण्यासाठी मूलभूत त्रिपाद संकल्पनेचा उपयोग होतो.

३. त्रिपादातील तीन पादांच्या अभ्यासाने ज्ञानयुक्त कर्म करण्याची प्रवृत्ती होते.

७ . संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी विश्लेषणात्मक, संश्लेषणात्मक तसेच काही ठिकाणी तुलनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. सर्वांगयोग या ग्रंथांच्या आधारे त्रिपाद संकल्पनेचे विश्लेषण करण्यात येईल.

दशोपनिषदे, श्रीमद्भगवद्गीता, योगोपनिषदे या ग्रंथांचे संदर्भ घेऊन या ग्रंथातील त्रिपादींचे विश्लेषण करण्यात येईल.

(विश्लेषण म्हणजे एकाच पदार्थात असलेले अनेक गुणधर्म जाणणे. संश्लेषण म्हणजे जाणलेले विविध अनुभव एकाच पदार्थाचे आहेत हा निष्कर्ष प्राप्त होणे. सर्व अनुभवांना एकत्रित करणे म्हणजे सर्व अनुभवांचा योग केल्याने ज्या वस्तूचा अनुभव होतो आहे, त्या वस्तूचा बोध होतो आणि जाणण्याची प्रक्रिया पूर्ण होते.)

८. प्रकरणांची विभागणी

प्रकरणांची विभागणी खालील प्रमाणे असेल.

प्रस्तावना

विषयाची पार्श्वभूमी, या विषयावरील आत्तापर्यंत झालेले पूर्वसंशोधन, संशोधनाची उद्दिष्टे , मुख्य संकल्पनांची शास्त्रीय व्याख्या, शोध प्रबंधाची रूपरेषा याचा समावेश असेल.

प्रकरण १. ग्रंथांचा परिचय

प्रस्तुत शोधनिबंधासाठी जे ग्रंथ निवडले आहेत. त्यांचा परिचय या प्रकरणात देण्यात येईल.

प्रकरण २. त्रिपादातील तीन पादांचे सर्वांगयोग ग्रंथाच्या आधारे विश्लेषण

व्यक्त / स्थूल / क्षर पादाचे विश्लेषण, अव्यक्त / सूक्ष्म / अक्षर पादाचे विश्लेषण, व्यक्ताव्यक्त / कारण / पुरुषोत्तम पादाचे विश्लेषण

प्रकरण ३. दशोपनिषदातील त्रिपादींचे विश्लेषण

दशोपनिषदे - ईशावास्योपनिषद्, केनोपनिषद् कठोपनिषद्, प्रश्नोपनिषद्, मुण्डकोपनिषद्, माण्डूक्योपनिषद्, ऐतरेयोपनिषद्, तैत्तरीयोपनिषद्, श्वेताश्वतरोपनिषद्, बृहदारण्यकोपनिषद्

प्रकरण ४. श्रीमद्भगवद्गीतेतील त्रिपादींचे विश्लेषण

प्रकरण ५. योगोपनिषदातील त्रिपादींचे विश्लेषण

योगोपनिषदे - अद्वयतारकोपनिषत्, अमृतनादोपनिषत्, अमृतबिन्दूपनिषत्, क्षुरिकोपनिषत्, तेजोबिन्दूपनिषत्, तरिशिखिब्राह्मणोपनिषत्, दर्शनोपनिषत्, ध्यानबिन्दुपनिषत्, नादबिन्दूपनिषत्, पाशुपतब्रह्मोपनिषत्, ब्रह्मविद्योपनिषत्, मण्डलब्राह्मणोपनिषत्, महावाक्योपनिषत्, योगकुङण्डल्युपनिषत्, योगचूडामण्युपनिषत्, योगतत्त्वउपनिषत्, योगशिखोपनिषत्, वराहोपनिषत्, शाण्डिल्योपनिषत्, हंसोपनिषत्

निष्कर्ष व उपसंहार

त्रिपाद संकल्पनेच्या अभ्यासाचे परिणाम (नीतीचे प्रकटीकरण, ज्ञानयुक्त कर्म, अनन्यभक्ती), प्रस्तुत विषयासंबधित वरील संशोधन आराखड्याप्रमाणे निष्कर्ष या प्रकरणात येतील त्याचबरोबर हा आराखडा प्राथमिक स्वरूपाचा असल्याने यात भविष्यात काही बदल अपेक्षित असल्यास तसे बदल करण्यात येतील. या विषयात अजून काय संशोधन होऊ शकते हे नमूद करण्यात येईल.

९. संदर्भग्रंथ सूची

१) अथ पातंजलयोगदर्शनम् व्यासभाष्यसहितम्, दर्शन योग महाविद्यालय, साबरकांठा (गुजरात), २०१४

२) ईशादि नौ उपनिषद, हरिकृष्णदास गोयंका, गोरखपुर, गीता प्रेस

३) चमत्कार निर्णय, भगवान श्रीमायानंद चैतन्य, औपधर्म प्रकाशक, भाग, ओंकारेश्वर, २००७, तृतीय आवृत्ती

४) नर-नारायण, भगवान श्रीमायानंद चैतन्य, औपधर्म प्रकाशक, ओंकारेश्वर, १८८४

५) बुद्ध अवतार, दिनकर यादव मार्डीकर, अध्यात्म विज्ञानशाला, मांधाता, २०२०

६) ब्रह्म विद्येचा विज्ञानपाठ (स्पंदतत्वावर आधारित), गोखले, प्र. वा., पुणे, २००१

७) स्वराज्य दर्शन, जगद्गुरु स्वराज्यानंद, अध्यात्म विज्ञानशाळा, ओंकारेश्वर, २०२१

८) सर्वांगयोग, डॉ.जीवनानंद चैतन्य, अध्यात्म विज्ञानशाळा, ओंकारेश्वर, २००८

९) योगोपनिषद, विभावारी सदानंद गाडगीळ, पुणे

१०) वैदिक धर्मखंड भाग १, सातवळेकर श्री. दा., स्वाध्याय मंडळ, पारडी (गुजरात), १९५७

११) ऋग्वेद संहिता, गीता प्रेस, गोरखपुर

१२) श्रीमद्भगवद्गीता, गीता प्रेस, गोरखपुर

१३) श्रीमद्भगवद्गीतोपनिषद् भाष्य, भगवान श्रीमायानंद चैतन्य, ओंकारेश्वर, अध्यात्म विज्ञानशाळा, २०१५

१४) श्री तुकारामांच्या अभंगाची गाथा, तुकाराम महाराज, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०११

१५) The Yoga upnishad-s,Shastri, Pandit A. Mahadev. The Adiyar Liabrary and Research Center, Madras,1883, SIX.

१६) Constitution of the universe in vedic literature with special reference to Shri Mayananda Chaitanya, Chandekar S. B. Savitribai Phule Pune University, Pune, 1998.

१७) Divine Vision of Bhagwan Mayanand Chaitanya, Acharya D.Y. Mardikar, Shrimati S. Chandrika Devi Mardikar, Nagpur, 1950

मार्गदर्शिका:	संशोधिका:
प्रा. डॉ. कलापिनी अगस्ती, विभागप्रमुख, भारतीयदर्शन विभाग, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक, नागपूर, महाराष्ट्र	जान्हवी ऋतुराज भांडारी, शोधछात्रा, योगविज्ञान तथा समग्र स्वास्थ्याविभाग, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक, नागपूर, महाराष्ट्र